**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ९०/२०१८-१९/१०७ दिनांक: ०३.०६.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ९०(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री किरण शिवाजी जाधव,<br>जोतीबा मंदीराजवळ वरची गल्ली<br>तासगांव ता. तासगांव जि. सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सांगली ग्रामिण विभाग सांगली | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग तासगांव दोन | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष २श्री. एन.के.ताडे, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,(आजारपणामुळे अनिश्चित कालावधीसाठी गैरहजर, ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ च्या विनियम क्र.५.२ अन्वये पूर्ण गणपूर्ती.)

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार
**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार तक्रारदाराने त्याने माहे जून-२०१८ मध्ये दाखल केलेल्या , शेती विज पंपासाठी नवीन वीज जोडणी करिता दिनांक २२.०६.२०१८ रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार विज जोडणी सत्वर देण्याचा आदेश व्हावा व नुकसान भरपाईचा आदेश व्हावा, या करिता दाखल केलेला आहे.

तक्रारदाराचे थोडक्यात कथन असे की, त्याने उपनिर्दिष्ट तारखेस शेती पंपाकरिता नवीन विज जोडणी मिळण्याचा अर्ज दाखल केला असून आजतागायत नवीन वीज जोडणी मिळालेली नसून त्यास अंदाजपत्रक देखिल अद्यापपावेतो मिळालेले नाही. सबब वि.प. कंपनीने त्यास विज जोडणी सत्वर देण्याचा आदेश व्हावा व कृती मानकानुसार झालेल्या विलंबाकरिता त्यास नुकसान भरपाई मिळावी.

प्रस्तुत प्रकरणांची नोटीस मिळाल्यानंतर विज वितरण कंपनीने कार्यकारी अभियंता (सं व सु. ) ग्रामिण विभाग, सांगली यांचे मार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे मांडलेले आहे. वि.प. कंपनीच्या कथनानुसार तक्रारदाराने थ्री-फेज शेती पंप कनेक्शन करिता दिनांक २२.०६.२०१८ रोजी उपविभाग तासगाव-२ येथे अर्ज दिलेला होता. तथापि वि.प. कंपनीच्या धोरणात्मक निर्णयानुसार दिनांक ०१.०६.२०१८ पासून आज अखेर शेती पंपाचे, ऑफिसमार्फत कोटेशन काढणेची प्रक्रिया एन.सी. मोडयूल मधून थांबविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे तक्रारदारास उपविभागीय कार्यालयाकडून कोटेशन देता येऊ शकले नाही . तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दिनांक २४.१०.२०१८ रोजी अर्ज दाखल केला असता सदर कक्षाने दिनांक ०८.२.२०१९ रोजी पुढील प्रमाणे निर्णय दिलेला आहे" ग्राहकांस अनामत रक्कम भरुन घेण्याचे कोटेशन देण्याची कार्यवाही बंद असल्यामुळे ग्राहकास कोटेशन देता येत नाही व पुढील कार्यवाही करता येत नाही. सदर प्रणाली सुरु झाल्यानंतर ग्राहकास महावितरण कंपनीच्या नियमानुसार कोटेशन देण्यात यावे." सध्या स्थितीत महावितरणच्या नवीन कनेक्शन प्रणालीमधून शेती पंपाचे कोटेशन देता येत नाही नवीन कनेक्शन प्रणालीमधून शेती पंप कोटेशन देण्याची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर तक्रारदाराच्या शेती पंप विज जोडणी मागणी अर्जावर वितरण कंपनीच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तथापि महावितरणच्या परिपत्रक क्रमांक २४७२ दिनांक २४.०१.२०१९ व परिपत्रक क्र. ३०१७५ दिनांक २१.१२.२०१८ नुसार विज पंप विद्युत जोडणीसाठी (१) मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना (२) स्वःखर्चाने रोहित्र उभारणे (डीडीएफ(एचव्हीडीएस)) हे पर्याय उपलब्ध आहेत व ते ग्राहकास उ.काअ/तासगांव-२ /७०३ दिनांक २५.०४.२०१९ अन्वये तक्रारदारास कळविण्यात आलेले आहे. विज वितरण कंपनीच्या कथनानुसार तक्रारदार हा महावितरण कंपनीचा ग्राहक नसल्याने सदरची तक्रार या मंचापुढे चालू शकत नाही. तसेच अर्जदारास कोटेशन देण्याची प्रक्रिया अवलंबिणे हा धोरणात्मक निर्णयाचा भाग असल्याने स्थानिक उपविभागीय किंवा विभागीय कार्यालयास जबाबदार धरण्यात येऊ नये किंवा होणा-या विलंबाकरिता त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई करु नये.

प्रस्तुत प्रकरणांची सुनावणी या मंचापुढे दिनांक ०२.०५.२०१९ व आज रोजी घेण्यात आली सुनावणी दरम्यान तक्रारदार स्वतः व त्यांचे प्रतिनिधी श्री अलमशहा मोमीन तर वि.प. विज वितरण कंपनी तर्फे श्री समीर अत्तार, उपकार्यकारी अभियंता सांगली ग्रामिण विभाग सांगली व श्री भारत पा. व्हनमाने, उपकार्यकारी अभियंता तासगांव-२ हे हजर होते.

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

दोन्ही सुनावनी दरम्यान विज वितरण कंपनी तर्फे हीबाब प्रक्रषाने मांडण्यात आली की विज वितरण कंपनींच्या धोरणात्मक निर्णयामुळे नवीन शेती पंप विज जोडणी करता कोटेशन देखिल जारी करता येत नाही व ती संपूर्ण प्रक्रिया महावितरण कंपनीने धोरणात्मक निर्णय घेऊन थांबविलेले आहे, व ती प्रक्रिया पुन्हा केव्हा सुरु करण्यात येईल याबाबत या क्षणी काही सांगता येत नाही .तथापि वर नमूद केलेले दोन पर्याय हे ग्राहकांला अत्यंत लाभदायक असून त्या खाली लवकर विज जोडणी देता येवू शकेल. मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजनाया योजनेचे वैशिष्ट दिनांक ०२.०५.२०१९ सुनावणीच्या दरम्यान उभय अभियंत्यांनी या मंचासमोर तक्रारदारास व त्याचे प्रतिनिधीस समजावून सांगितल्या नंतर तसेच तक्रारदाराने दिनांक २२.०६.२०१८ रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार जर नवीन विज जोडणी द्यावयाची झाली तर आणि जरी या मंचाने आदेश पारित केला तरी प्रत्यक्ष विज जोडणी देण्याकरिता देण्यात येणा-या अडचणीचा विचार करता कमीकमी तीन वर्षाचा कालवधी लागेल. असे या मंचासमोर प्रतिपादीत केले. त्यावरुन मंचाने तक्रारदारास मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना या योजने खाली नवीन विज जोडणी घेण्याचे फायदाचा विचार करुन तो पर्याय निवडावा असे सूचित केले. त्यावरुन तक्रारदाराने आजतागायत मुदत मागितली असता ती मंजूर करुन प्रकरण आज रोजी सुनावणी करता घेण्यात आले. सुनावणी दरम्यान उभय अभियंत्यांनी तक्रारदाराने मुख्यमंत्री सौर कृषि योजने खाली दिनांक १७.०५.२०१९ रोजी विज जोडणी देण्याकरिता सर्वतः परिपूर्ण अर्ज सादर केल्याचे व तो विचाराधीन असल्याचे प्रतिपादन केले यांचा अर्थ तक्रारदाराने विज वितरण कंपनीतर्फे सूचविण्यात आलेल्या पर्यायाचा विचार करुन त्यांतील एक पर्याय निवडलेला आहे . विज वितरण कंपनीतर्फे या मंचासमोर असेही स्पष्ट करण्यात आले की मुख्यमंत्री सौर कृषी योजने खाली प्राप्त झालेल्या अर्जामधून २५००० नवीन कृषी पंप देण्याची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून त्यापुढील अर्जामध्ये तक्रारदाराच्या दिनांक १७.५.२०१९ अर्जाचा समावेश करण्यात येईल, आणि पुढील सहा महिन्याच्या कालावधीमध्ये त्यास नवीन सौर ऊर्जा कृषि पंप जोडणी देण्यात येईल. तक्रारदाराने सदर योजनेचा पर्याय अवलंबिलेला असल्याने त्या अर्जानरुप काही आदेश पारित करण्यात येतील असे या मंचास वाटते. पुढील निविदा प्रक्रिया राबविताना तक्रारदाराचा अर्ज प्राधानाने विचार घ्यावा असा आदेश पारित करता येईल असे या मंचाचे मत आहे जेणे करुन उभय पक्षकाराच्या सोयी अडचणीचे निरसन होईल सबब आम्ही खालील आदेश पारित करित आहोत.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदारने दिनांक १७.०५.२०१९ दाखल केलेल्या, मुख्यमंत्री सौरकृषि पंप योजने खाली जोडणी मिळण्याकरिता अर्जाचा समावेश प्राधान्यांनी पुढील निविदा प्रक्रियेत करुन त्यास त्या योजने खाली लवलकरात लवकर विज जोडणी द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

3/06

(एन.के. ताडे)
सदस्य सचिव

8/6/2017

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण